# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते
# ‘महिंद्रा’च्या नव्या कारचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.चे पनवेल येथील अधिकृत डिलर असलेल्या ग्लोबल गॅलरीत एक्सयूव्ही ५००च्या डब्ल्यू ४ मॉडेल (कार)चे अनावरण पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १०) करण्यात आले. या कारची किंमत १०.८३ लाख रुपये एवढी आहे.

या प्रवेश स्तरावरील डब्ल्यू ४ मॉडेलमध्ये एमहॉक १४० बीएचपी हे इंजिन आहे. चित्त्यापासून प्रेरित डिझाईनसह तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि आरामदायीपणा ही सर्व या नव्या मॉडेलची वैशिष्ट्ये आहेत.

मॉडेलच्या अनावरणानिमित्त ग्लोबल गॅलरीचे पनवेल येथील कार्यकारी संचालक एस. के. मल्होत्रा म्हणाले की, एक्सयूव्ही ५०० हे मॉडेल ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे.



**‘महिंद्रा ॲण्ड महिंद्रा’च्या एक्सयूव्ही ५००च्या डब्ल्यू ४ मॉडेलचे अनावरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी पनवेल येथे करण्यात आले.**

अवघ्या दोन वर्षांच्या काळात या मॉडेलची ७४ हजार वाहने रस्त्यावर असून, हे महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.च्या यशस्वी अनावरणांपैकी एक आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी नव्या मॉडेलसाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. आणि ग्लोबल गॅलरीला हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## ही आहेत वैशिष्ट्ये

*एक्सयूव्ही ५००च्या डब्ल्यू ४च्या मॉडेलला अद्ययावत २.२ लीटर एमहॉक डिझेल इंजिनची ऊर्जा आहे. त्यातून शक्तिशाली १४० बीएचपी आणि ३३० एनएम टॉर्क मिळतो. यातील २.२ लीटर इंजिनाला ६ स्पीड ट्रान्समिशन आणि पाचव्या पिढीतील व्हेरिएबल जॉमेट्री टर्बोचार्जरची जोड मिळाली असून, ते एक्सयूव्ही ५००ला ताशी ० ते ६० किमीपर्यंत अवघ्या ५.४ सेकंदात नेते. इतकी प्रचंड शक्ती असतानाही १५.१ प्रतिलिटरचे मायलेज आहे. अद्ययावत मायक्रो हायब्रिड तंत्रज्ञान इंधन आणि निसर्गाचेही संरक्षण करते. या व्यतिरिक्त त्यात विविध प्रकारचे तंत्रज्ञान, सुरक्षा आणि आरामदायी वैशिष्ट्येही आहेत.*